**अपील क्र. मुमाआ/नो.क्र.३७८६/२४/अ.क्र.२४०/२५**

अपिलार्थी श्री.प्रभाकर भोगले
अ-२०४, विवा-विशाखा, विवा तारांगण फेझ-२,
फूलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर-४०१३०५.

**सुनावणी दिनांक : २०.०३.२०२५ (In continuation of order dt.25.02.2025)**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

दि.२५.०२.२०२५ रोजी आयोगाने विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) एफ/दक्षिण विभाग व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता एफ/दक्षिण विभाग कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांना सुनावणीची नोटीस प्राप्त असूनही अनुपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अनुपस्थितीबद्दलच्या लेखी खुलासासह व त्यांचेवर प्रत्येकी रु.१०,०००/- दंड का लावण्यात येऊ नये, याच्या खुलासासह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे असे आदेश पारित केले होते.

जन माहिती अधिकारींनी माहिती दिली नाही म्हणून अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि.०८.०२.२०२१ रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांचा अर्ज दि.१२-०२-२०२४ अन्वये दि.२४-१२-२०१९ ते १२-०२-२०२४ पर्यंत सिता सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या इमारतीतील पहिल्या मजल्यावरील अनधिकृत बांधकामाबाबत माहिती विचारलेली आहे.

आजच्या पुर्नसुनावणीस अपिलकर्ता, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ. व का.) उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आजच्या पुर्नसुनावणीस अपिलकर्तांनी आयोगास सादर केले की, दि.२०-०३-२०२५ रोजी लेखी निवेदन दिले आहे की, सदर विषयी दिवाणी न्यायालयात प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्यांची बाजू मांडण्याकरीता माहितीची मागाणी केली होती. अभिलेख उपलब्ध असून सुध्दा त्यांना माहिती मिळण्यापासून वंचित ठेवण्यात आले म्हणून संबंधित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचेवर दंडातत्मक कारवाई करण्यात यावी.

आजच्या पुर्नसुनावणीस विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ. व का.) यांनी आयोगास सादर केले की, आतापर्यंत माहिती देण्यात आली नाही. अभिलेख तपासून माहिती देण्याकरीता आणलेली आहे.

आजच्या पुर्नसुनावणी दरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारींनी तयार करुन आणलेली माहिती अपिलकर्तास देण्यात आली ती त्यांनी स्विकारली.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:-

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ. व का.) यांनी माहिती अर्जावर विहित मुदतीत नियमानुसार कार्यवाही केलेली नाही त्यामुळे अधिनियमाच्या कलम ७ (१) चा भंग केलेला असल्याने त्यांचे विरूध्द अधिनियमाच्या कलम २० (१) नुसार कारवाई का करणेत येवू नये? या बाबतचा खुलासा आदेश प्राप्ती पासून एक महिन्याच्या आत आयोगास सादर करावा, अन्यथा आयोगाच्या आदेशाच्या उल्लंघनाची कृती दंडात्मक कारवाईस पात्र ठरेल.

२. तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.सिध्दांत सोनवणे यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जास मुदतीत प्रतिसाद न देऊन त्यांनी अधिनियमाच्या कलम ७ (१) च्या तरतुदीचे उल्लंघन केले असल्याने त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० (१) नुसार रु. २५०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) शास्तीची कार्यवाही करण्यात का करण्यात येवू नये याबाबतचा खुलासा त्यांनी आदेश प्राप्तीच्या ३० दिवसात आयोगात सादर करावा अन्यथा शास्तीची रक्कम अंतिम करण्यात येईल.

३. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थींनी दि.२६-०३-२०२४ अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय निर्गमित केलेला दिसून येत नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, यांचे शासन परिपत्रक क्र.के.मा.अर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ नुसार आवश्यक कार्यवाही का करण्यात येवू नये याबाबतचा खुलासा त्यांनी ३० दिवसात आयोगास सादर करावा.

४. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

प्रदीप व्यास
26-3-2025
**(डॉ.प्रदीप व्यास)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : २६.०३.२०२५**